# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय – रस्ते व दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये पुनर्विनियोजन करणेकामी अर्थसंकल्पीय तरतूदीचे प्रशासकीय ठराव करुन घेणेबाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.आयुक्त सा०. यांचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दरवर्षी उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतूद करण्यात आली होती. या तरतूदी मधून आतापर्यंत खर्च झाल्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२४-२५ करीता करणेत आलेली तरतूद (प्र.प वगळून) (रक्कम लाखात) | दि.२३/०७/२०२४ पर्यत नोंदविलेली तरतूद रककम (रक्कम लाखात) | दि. २३/०७/२०२४ पर्यंतची शिल्लक (रक्कम लाखात) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | रस्ते व पदपथ दुरुस्ती | रु. ३६२.०७ लक्ष | रु. २१४.९० लक्ष | रु.१४७.१७ लक्ष | |
| | एकूण | रु. ३६२.०७ लक्ष | रु. २१४.९० लक्ष | रु.१४७.१७ लक्ष | |

सन २०२४-२०२५ या वित्तीय वर्षाचा जो अर्थसंकल्प मंजूर झाला आहे, त्यामधील रस्ते व पदपथ दुरुस्ती या लेखाशिर्षामधील निधी कमी आहे. दि.२३/७/२०२४ पर्यत रु.१४७.१७ लक्ष शिल्लक आहे. खालील कामाचे अंदाजपत्रक रु.२,२२,६२,३००/- इतक्या रक्कमेचे आहे. मात्र रस्ते व पदपथ दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये निधी पुरेसा नाही. तसेच ४ महिन्यामध्ये सदर लेखाशिर्षामधील निधी संपल्यामुळे पुढील कामांकरीता निधीची आवश्यकता भासणार आहे. रस्ते व पदपथ दुरुस्तीची कामे मनपा कार्यक्षेत्रात सुरुच असल्यामुळे सदर लेखाशिर्षामध्ये वाढीव रक्कमेचे पुर्नविनियोजन करणे गरजेचे आहे. काही प्रस्ताव तरतूद अभावी प्रलंबीत आहेत. तरी खालील कामाकरीता व वाढीव निधी करीता वरील लेखाशिर्षामध्ये "स्व.मिनाताई ठाकरे नाटयगृह देखभाल व दुरुस्ती खर्च " या लेखाशिर्षामधुन रु. ३८०.००/- लक्ष रुपयाचे पुर्नविनियोजन करावयाचे आहे.

| कामाचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|
| प्रभाग समिती क्रमांक ०२ च्या कार्यक्षेत्रातील टेमघर कल्याण रोड लाभ इन्क्लेव प्रोजेक्ट व लाभ इन्क्लेव ते पाईपलाईन पर्यतचा रस्ता विकसित करणे. | रु. २२२.६३/- लक्ष | |
| एकूण | रु. २२२.६३/- लक्ष | |

**खालील लेखाशिर्षामधून पुनर्विनियोजन करावयाचे आहे.**

| अ. क्र. | लेखाशिर्षाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद (रक्कम लाखात) | दि. २३/०७/२०२४ पर्यत नोंदविलेली तरतूद रक्कम (रक्कम लाखात) | दि. २३/०७/२०२४ पर्यंतची शिल्लक तरतूद रक्कम(रक्कम लाखात) | पुनर्विनियोजना करीता घ्यावयाची रक्कम (रक्कम लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| | स्व.मिनाताई ठाकरे नाटयगृह देखभाल व दुरुस्ती खर्च | रु.४००.०० लक्ष | रु.०.०० लक्ष | रु.४००.०० लक्ष | रु.३८०.०० लक्ष |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२,कलम १०३ व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षाखाली रक्कम खर्च झाली नाही व त्यात बचत झाली तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करून भागवीता येवू शकतो व असे पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. मात्र सध्या स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त सा०ो. यांच्याकडे निहीत आहेत.

प्रभाग समिती क्रमांक ०२ च्या कार्यक्षेत्रातील टेमघर कल्याण रोड लाभ इन्क्लेव प्रोजेक्ट व लाभ इन्क्लेव ते पाईपलाईन पर्यतचा रस्ता विकसित करणे. विषयांकित काम हे निविदा स्तरावर असून निधी अभावी प्रलंबित असल्यामुळे पुनर्विनियोजन करणेकामी कनिष्ठ अभियंता, प्रभाग समिती क्र.२ यांनी मुळ संचिकेसह प्रस्ताव सादर केलेला आहे. त्या अनुषंगाने रस्ते व पदपथ दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये वाढीव तरतूद रक्कमेसह "स्व.मिनाताई ठाकरे नाटयगृह देखभाल व दुरुस्ती खर्च" या लेखाशिर्षामधून रु.३८०.०० लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन करणे आवश्यक असून त्याचा स्वतंत्र नमूना क्र.१० नियम ३० (३) प्रस्ताव तयार केला आहे. त्यास दिनांक २२ /०७ /२०२४ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी यासाठीचा प्रशासकीय ठराव मंजुर करुन घ्यावा ही विनंती.

**ठराव क्र.** ४८० **दिनांक** ५/ ८ /२०२४

प्रभाग समिती क्रमांक ०२ च्या कार्यक्षेत्रातील टेमघर कल्याण रोड लाभ इन्क्लेव प्रोजेक्ट व लाभ इन्क्लेव ते पाईपलाईन पर्यतचा रस्ता विकसित करणेबाबतचे काम करणे गरजेचे आहे. सदर काम निविदा स्तरावर असून निधी प्रस्तावापेक्षाही कमी असल्याने प्रलंबित आहे. रस्ते व पदपथ दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये निधी पुरेसा नाही. तसेच सततच्या पावसामुळे भिवंडी कार्यक्षेत्रातील रस्ते खुपच खराब झाल्यामुळे ४ महिन्यामध्ये सदर लेखाशिर्षामधील निधी संपल्यामुळे पुढील कामांकरीता निधीची आवश्यकता भासणार आहे. रस्ते व पदपथ दुरुस्तीची कामे मनपा कार्यक्षेत्रात सुरुच आहेत. काही प्रस्ताव तरतूद अभावी प्रलंबीत आहेत. सदर लेखाशिर्षामध्ये वाढीव रक्कमेचे पुनर्विनियोजन करणे गरजेचे आहे. तरी रस्ते व पदपथ दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये "स्व.मिनाताई ठाकरे नाटयगृह देखभाल व दुरुस्ती खर्च" या लेखाशिर्षामधून एकूण रु.३८०.०० लक्ष वाढीव निधी रस्ते व पदपथ दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये पुनर्विनियोजनाने वर्ग करणेस महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

o/c